# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई

महाराष्ट्र शासनाने मुंबई सा.बां.परिमंडळाला दिलेल्या प्राधिकारानुसार खालील संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांकडून सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, मुंबई स्पर्धात्मक परिक्षेसाठी खालील दिलेल्या संवर्गाकरिता केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा www.pwdmumbaicircle.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahapwd.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| ऑनलाईन अर्ज भरायची सुरुवात | ऑनलाईन अर्ज भरायची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक २०/१२/२०१२ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून | दिनांक ०३/०१/२०१३ दुपारी १२.०० वाजेपर्यंत |

भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम व सूचना www.pwdmumbaicircle.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. भरती प्रक्रिया संदर्भातील अंतिम निर्णय अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ व समन्वय अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां) परिमंडळ, मुंबई यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील.

**रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे**

| अ. क्र. | संवर्गाचे नांव | वेतन बॅन्ड | सामाजिक आरक्षण | प्रवर्ग निहाय रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महिला ३०% | खेळाडू ५% | सर्व साधारण | एकुण भरावयाची पदे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट ‘ब’ (अराजपत्रित) | रु. ९३००-३४८०० ग्रेड पे-रु.४३००/- | अ.जा. | ११ | ३ | १ | ७ | ११ |
| | | | अ.ज. | ३५ | ११ | २ | २२ | ३५ |
| | | | वि.जा.(अ) | ०१ | ० | ० | १ | १ |
| | | | भ.ज.(ब) | ०१ | ० | ० | १ | १ |
| | | | भ.ज.(क) | १४ | ४ | १ | ९ | १४ |
| | | | भ.ज.(ड) | १२ | ४ | १ | ७ | १२ |
| | | | वि.मा.प्र. | १० | ३ | १ | ६ | १० |
| | | | इ.मा.व. | ० | ० | ० | ० | ० |
| | | | खुला | ० | ० | ० | ० | ० |
| | | | एकुण... | ८४ | २५ | ६ | ५३ | ८४ |

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | वेतन बॅंड | सामाजिक आरक्षण | प्रवर्ग निहाय रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | माजी सैनिक १५% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | सर्व साधारण | एकुण भराव याची पदे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| २. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक गट ‘क’ | रु. ५२००-२०२०० ग्रेड पे-रु.२४००/- | अ.जा. | ९ | १ | ३ | ० | १ | ० | ० | ४ | ९ |
| | | | अ.ज. | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | | | वि.ज.(अ) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | भ.ज.(ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | भ.ज.(क) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | भ.ज.(ड ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | इ.मा.व. | ५ | १ | २ | ० | १ | ० | ० | १ | ५ |
| | | | खुला | २३ | ३ | ७ | १ | २ | १ | ० | ९ | २३ |
| | | | एकुण | ४० | ५ | १३ | १ | ४ | १ | ० | १६ | ४० |

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | वेतन बँड | सामाजिक आरक्षण | प्रवर्ग निहाय रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | माजी सैनिक १५% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | सर्व साधारण | एकूण भराव याची पदे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| ३. | वरिष्ठ लिपिक गट ‘क’ | रु. ५२००-२०२०० ग्रेड पे-रु.२४००/- | अ.जा. | ४ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | ४ |
| | | | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | वि.ज.(अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | भ.ज.(ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | भ.ज.(क) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | भ.ज.(ड ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | इ.मा.व. | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | | | खुला | ९ | १ | ३ | ० | १ | ० | ० | ४ | ९ |
| | | | एकुण | १७ | २ | ५ | ० | १ | ० | ० | ९ | १७ |

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | वेतन बँड | सामाजिक आरक्षण | प्रवर्ग निहाय रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | माजी सैनिक १५% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | सर्व साधारण | एकूण भराव याची पदे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| ४. | कनिष्ठ लिपिक गट ‘क’ | रु. ५२००-२०२०० ग्रेड पे-रु.१९००/- | अ.जा. | ३ | ० | १ | ० | ० | ० | ० | २ | ३ |
| | | | अ.ज. | ७ | १ | २ | ० | १ | ० | ० | ३ | ७ |
| | | | वि.ज.(अ) | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | | | भ.ज.(ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | भ.ज.(क) | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | | | भ.ज.(ड ) | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | | | वि.मा.प्र. | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | | | इ.मा.व. | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | | | खुला | ८ | १ | २ | ० | १ | ० | ० | ४ | ८ |
| | | | एकुण | २८ | २ | १० | ० | २ | ० | ० | १४ | २८ |

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | वेतन बँड | सामाजिक आरक्षण | प्रवर्ग निहाय रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | माजी सैनिक १५% | महिला ३०% | खेळाडू ५% | पदविकाधारक/ अंशकालीन १०% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | सर्व साधारण | एकूण भराव याची पदे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| ५. | संगणक गट 'क' | रु. ५२००-२०२०० ग्रेड पे-रु.१९००/- | अ.जा. | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | | | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | वि.ज.(अ) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | भ.ज.(ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | भ.ज.(क) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | भ.ज.(ड ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | इ.मा.व. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | एकुण | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ३ | ४ |

**टिपः- १)** स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई सा.बां.परिमंडळ, मुंबई यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. **वर दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.** तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई सा.बां.परिमंडळ, मुंबई यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

**२)** सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग, मंत्रालय, यांचे अपंग-२०११/प्रक्र.९१/सुधारणा-३, दि.१३/०९/२०११ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार व सा.बां.विभागाचा शासन निर्णय क्र.अपंग-२०११/प्र.क्र.१७७/सुधारणा-३ दि.१५/१०/२०११ नियुक्तीसाठी निश्चित केलेल्या केंद्र शासनाच्या पदांच्या यादीनुसार अपंग उमेदवार श्रवणशक्तीतील दोष **(HH)**, चलनवलन सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय दि.१९/३/२०१० विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू, (एका हाताने/पायाने अधू व्यक्ती- **OA,OL).** पात्र राहतील.

**३)** कनिष्ठ अभियंता या संवर्गातील अपंगांसाठीचे ९ पदे राखीव असून ती खालीलप्रमाणे भरण्यात येतील.

अ) श्रवण शक्तीतील दोष (hearing impairment) या प्रवर्गातील.........................................................(४पदे)

ब) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू(locomotor disability or cerebral palsy)या प्रवर्गातील(५पदे)

**एकुण... ९ पदे**

**४) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गातील अपंगासाठी**

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गातील अपंगांसाठीचे २ पदे राखीव असून ती खालीलप्रमाणे भरण्यात येतील.

श्रवण शक्तीतील दोष (hearing impairment) ...................................................................................... २

५) अपंग संवर्गातील उमेदवाराकडे किमान अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र असावे. अपंग उमेदवारास लेखी परिक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरताना तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाची परीक्षेची शुल्क रक्कम रु.१००/- ही चलनाद्वारे परिक्षा शुक्लामध्ये वाढ करुन त्याप्रमाणे भरावी लागेल व ती ना परतावा राहील. ज्या उमेदवारांनी लेखनिकाची अर्जात मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळेस लेखनिक पूरविला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. अपंग प्रवर्गातील पात्र उमेदवारांची अंतिम नियुक्ती ही स्थायी वैद्यकीय मंडळाच्या पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे करण्यात येईल.

६) ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना वरील भरतीच्या पदासाठीच्या लेखी परिक्षेसाठी स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे अर्ज ऑनलाईनच सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

७) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजी पूर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अहर्ता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वैगरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

८) उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परिक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

९) **नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी**

१) उपरोक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून चाळणी स्पर्धा परिक्षेसाठी www.pwdmumbaicircle.in हे संकेतस्थळ उघडण्यात आलेले आहे.

२) शासन निर्णय सा.प्र.विभाग, क्रमांक प्रशासन-२०००/प्र.क्र.५/२००१/३२,दिनांक २०/०७/२००२ व दिनांक १९/०३/२००३ शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणे/वापराबाबतचे खालील नमूद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

अ) **D.O.E.A.C.C.** सोसायटीच्या अधिकृत **C.C.C.** किंवा **O.** स्तर किंवा **A** स्तर **B** स्तर किंवा **C.** स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

ब) महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत **MS-CIT** परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

३) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

४) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरीता शारिरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्रसादर करणे आवश्यक आहे.

५) मुलाखतीपूर्वी व नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला आवश्यकता असल्यास अद्ययावत नॉन क्रिमीलेअर दाखला तसेच आवश्यकती मूळ कागदपत्रे इत्यादीची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. मूळ कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतरच मुलाखतीसाठी पात्र / नियुक्तीस पात्र उमेदवारांना बोलविण्यात येईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. छाननी अंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास मुलाखतीसाठी / नियुक्ती दिली जाणार नाही / नियुक्ती रद्द होईल.

१०) **अर्ज करण्याची पद्धत :-**

१) प्रस्तुत पदांकरीता फक्त अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

२) पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज (www.pwdmumbaicircle.in) या वेबसाईटद्वारे दि.२०/१२/२०१२ ते दि.०३/०१/२०१३ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

३) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना (www.pwdmumbaicircle.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर, ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर, स्टेट बँक ऑफ ईंडीया बँकेत फी भरण्याचे चलन ३ प्रतींमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रत ) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहिल. सदरच्या ३ प्रतींपैकी उमेदवारास त्याची स्वतःची प्रत व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रत उमेदवारास स्टेट बँक ऑफ इंडिया, या बँकेकडून परत मिळेल. त्यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रत, उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी / मुलाखत घेतली जाणार नाही. बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक २१/१२/२०१२ ते दिनांक ०५/०१/२०१२

४) उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती www.pwdmumbaicircle.in या संकेतस्थळावरती पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

५) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा चालू ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी द्वारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदवणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच स्वतःचा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो व सही स्कॅन करुन www.pwdmumbaicircle.in संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहित पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

६) ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेनंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

७) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची यादी, परिक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/परिक्षाकेंद्र/बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर उपलब्ध राहील. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

११) **वयोमर्यादा :-** खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय १८ वर्षे पेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीयांसाठी उमेदवाराचे वय १८ वर्षे पेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. सदर वय हे दि.२०/१२/२०१२ रोजीचे असावे. शासन तरतुदीनुसार संबंधीत वर्गासमोर दर्शविल्याप्रमाणे उच्च वयोमर्यादेत शिथिलता आहे.

| | |
|---|---|
| १) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवार यांचेसाठी कमाल वयोमर्यादा | ३८ वर्षा पर्यंत |
| २) अपंग उमेदवार यांचेसाठी कमाल वयोमर्यादा | ४५ वर्षा पर्यंत |
| ३) प्रकल्पग्रस्त यांचेसाठी कमाल वयोमर्यादा | ४५ वर्षा पर्यंत |
| ४ अ) माजी सैनिक यांचेसाठी कमाल वयोमर्यादा | ४५ वर्षा पर्यंत |
| ४ ब) सशस्त्र दलात किमान ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिक यांचेसाठी वयोमर्यादा | त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवाकाल अधिक तीन वर्षे एवढा काल त्यांच्या विहित दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. |
| ४ क) अपंग माजी सैनिक यांचेसाठी कमाल वयोमर्यादा | ४५ वर्षा पर्यंत |
| ५) अंशकालीन उमेदवार यांचेसाठी कमाल वयोमर्यादा | ४६ वर्षा पर्यंत |
| ६) खेळाडू उमेदवार यांचेसाठी कमाल वयोमर्यादा | ५ वर्षा पर्यंत वयाची अट शिथील (खुला प्रवर्ग-३३ + ५, मागास प्रवर्ग-३८ + ५) |
| ७) भूकंपग्रस्त उमेदवार यांचेसाठी कमाल वयोमर्यादा | ४५ वर्षा पर्यंत |
| ८) स्वातंत्र संग्राम सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य, १९९१ चे जनगणना कर्मचारी व १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवार यांचेसाठी कमाल वयोमर्यादा | ४५ वर्षा पर्यंत |
| ९) सन १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान तंत्र शिक्षण शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणांरी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्ष मुदतीचा पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण केलेली असेल. | ४७ वर्षा पर्यंत |
| १०) शासकीय सेवेतील कर्मचारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा | ४५ वर्षा पर्यंत |

१२) शासन निर्णय शालेय व क्रिडा विभाग क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ३०.४.२००५ मधील तरतुदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण हे समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील खेळांचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे असावे. खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता ज्या उमेदवारांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील तपासणी अहवालानंतरच त्यांची नेमणूक देण्यात येईल.

१३) शासन निर्णय महिला व बालकल्याण क्र.८२/२००१/म.से.आ-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दि.२५/०५/२००१ मधील तरतूदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहिल. या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष २०१२-२०१३ या कालावधी करिता वैध असलेले (अर्थात ३१/०३/२०१३ पर्यंत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे.

१४) **उमेदवाराची अर्हता : खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता दिनांक २०/१२/२०१२ रोजी प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.**

**अ) शैक्षणिक अर्हता :**

**१) कनिष्ठ अभियंता या पदाकरीता :-** "जो शासनाने मान्यता दिलेली तीन वर्ष कालावधीची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणून शासन मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता धारण केलेली आहे." त्यानुसार सदर पदाकरीता स्थापत्य अभियांत्रिकी मधील **फक्त पदविकाधारक व समतुल्य अर्हता धारण असलेल्या पदविका धारकांनीच** अर्ज करावेत.

**२) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदांकरिता :-** १) एस. एस. सी. उत्तीर्ण. तसेच २) शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची १ वर्ष मुदतीची पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण किंवा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पाठयक्रमाशी समकक्ष असलेले, आर्किटेक्चरल ड्राफ्टसमन (वास्तुशास्त्रीय आरेखक), किंवा कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक), किंवा सिव्हिल ड्राफ्टसमन (स्थापत्य आरेखक), किंवा स्थापत्य आभियांत्रिकी मधील उच्च शैक्षणिक अर्हता धारक.

**३) वरिष्ठ लिपिक या पदांकरिता :-** उमेदवार शासनमान्य विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा.

**४) कनिष्ठ लिपिक या पदांकरिता :-** उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची किमान इयत्ता १० वी शालांत उत्तीर्ण असावा. इयत्ता १० वीला मराठी विषय असणे अनिवार्य आहे. इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० श.प्र.मि. व एम.एस.सी.आय.टी.(अथवा डी.ओ.ई.ए.सी.सी. ची 'सी.सी.सी.' स्तर किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर परिक्षा) परिक्षा उत्तीर्ण असावा.

**५) संगणक या पदांकरिता :-** १) एस.एस.सी.उत्तीर्ण तसेच २) इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० श.प्र.मि. व एम.एस.सी.आय.टी.(अथवा डी.ओ.ई.ए.सी.सी. ची 'सी.सी.सी.' स्तर किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर परिक्षा) परिक्षा उत्तीर्ण असावा. ३) संगणकाचे प्रात्यक्षिक ज्ञान, मेन्सुरेशन व कॅलक्युलेशन अनुभव.

**ब) संगणक अर्हता :-** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ मंत्रालय, मुंबई दिनांक १९ मार्च २००३ नुसार संगणक अर्हता (एम.एस.सी.आय.टी.) किंवा संगणक ज्ञानाची समकक्ष परिक्षा असावा किंवा नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत धारण करणे आवश्यक राहील ही अर्हता सर्व पदांकरीता लागू राहील.

**क) मराठी / हिंदी भाषा परीक्षा :-** शासकीय नियमानुसार निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे ही अर्हता सर्व पदांकरीता आवश्यक राहील.

१५) **<u>कनिष्ठ अभियंता संवर्गातील पदासाठी</u>**

**<u>माजी सैनिक :-</u>** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.आरटीए-१०८८/११९२/सीआर-२२/८९/१६२, दिनांक २८/०५/१९९२ मध्ये नमूद केल्यानुसार सशस्त्र दलात किमान ६ महिने सेवा केलेल्या किंवा यापेक्षा जास्त झाली आहे अशा माजी सैनिक/राजादिष्ठ अधिकाऱ्यांना सैन्यातील सेवेचा कालावधी अधिक तीन वर्षे इतकी कमाल वयाची सवलत नियुक्तीसाठी देण्यात येईल. (म्हणजेच त्यांच्या वयातून सैनिकी सेवेचा कालावधी कमी केल्यावर परिणामभूत वय हे विहित वयोमर्यादेपेक्षा तीन वर्षाहून अधिक असू नये.)

१६) **गट-क संवर्गातील पदासाठी भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त/अंशकालीन उमेदवारांसाठी आरक्षण :-**
शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : २७ ऑक्टोबर, २००९ अन्वये गट- क व गट-ड साठी असल्यामुळे गट-ब करीता लागू नाही.

१७) अंशकालीन कर्मचाऱ्यांना त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवार माजी सैनिकांचे वारस असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत करुन अर्जासोबत जोडावी. भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१८) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), आणि भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ३१/०३/२०१२ नंतरचे **(नॉन क्रिमीलेयर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.**

१९) विहित वयोमर्यादेतील शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचा अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करावी.

२०) सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, ०१ जुलै २००५ नुसार विहित केलेल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ, ब,क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना “अ” आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे.

२१) अनुभवाच्या बाबतीत मासिक नियतकालीक, अंशकालीक, विदयावेतन, अंशदानात्मक, विनावेतन, तत्वावर केलेला अंशकालीक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्याभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

२२) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्य दबाव आणल्या अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२३) **<u>परिक्षेचे स्वरुप :-</u>**

**१) कनिष्ठ अभियंता या पदाकरीता :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १९.१०.२००७ अन्वये उमेदवारांची निवड करताना २०० गुणांची लेखी परिक्षा व २५ गुणांची मौखिक परिक्षा घेऊन लेखी परिक्षा व मौखिक परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणानुसार गुणानुक्रमे उमेदवाराची निवड केली जाईल.

**२) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदांकरिता :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १९.१०.२००७ अन्वये उमेदवारांची निवड करताना १०० गुणांची लेखी परिक्षा, ८० गुणांची व्यावसायीक परिक्षा व २० गुणांची मौखिक परिक्षा घेऊन लेखी परिक्षा, व्यावसायीक परिक्षा व मौखिक परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणानुसार गुणानुक्रमे उमेदवाराची निवड केली जाईल.

**३) वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक व संगणक या पदांकरिता :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १९.१०.२००७ अन्वये लिपिक वर्गीय पदांसाठी उमेदवारांची निवड करताना मुलाखती न घेता फक्त लेखी परिक्षा घेऊन व लेखी परिक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल. वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपीक व संगणक या पदांसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी इत्यादी विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड यादी तयार करण्यात येईल.

२४) निवड झालेल्या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर २००५ नुसार लागू करण्यात आलेली नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

२५) सर्व पदांची परिक्षा एकाच दिवशी एकाच वेळी घेण्यात येणार असल्याची उमेदवारांनी अर्ज करतेवेळी नोंद घ्यावी.

२६) उमेदवारास लेखी परिक्षा/कागदपत्र पडताळणी/मौखिक मुलाखती इत्यादी करिता स्वखर्चाने यावे लागेल.

२७) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची यादी लेखी परिक्षे करीता संकेत स्थळावर दर्शविण्यात येईल.

२८) उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी अडचणी असल्यास भ्रमणध्वनी क्रमांक ८७९३०८३७२०/२१/२२ कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

२९) **परिक्षा शुल्क :-**

**अ)**

| **अक्र.** | **पद** | **खुला प्रवर्ग** | **राखीव प्रवर्ग** |
|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता | -- | २००/- |
| २. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, | ३५०/- | २५०/- |
| ३. | वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक व संगणक | ३००/- | १५०/- |

**(वर दर्शविण्यात आलेले परीक्षा शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)**

**ब)** माजी सैनिक : परीक्षा शुल्क नाही.

३०) उमेदवाराने यापूर्वी जरी त्याचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदवले असले तरी त्याने या पदांच्या भरतीसाठी वरील अधिकृत वेब साईटवर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहित ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

३१) उमेदवारास कार्बनलेस स्वरुपाची उत्तरपत्रिका परिक्षादिनी देण्यात येणार आहे व त्याची प्रत परिक्षाअंती उमेदवारास दिली जाईल. संकेत स्थळावरुन उत्तरतालिका परिक्षा झालेल्या दिवसापासून ५ दिवसात प्रसिद्ध केली जाईल जेणेकरुन उमेदवारास स्वत:चे गुण काढता येतील. तसेच उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांचे ओ.एम.आर. स्कॅनिंग द्वारे प्राप्त गुण वैयक्तिक रित्या पडताळता येण्याची सुविधा उक्त संकेतस्थळावर परिक्षेनंतर १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानंतर उमेदवारांची कागदपत्र पडताळणी, मौखिक/प्रात्यक्षिक परिक्षा इत्यादी प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

३२) लेखी परिक्षचे / मौखिक / प्रात्यक्षिक परिक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. परिक्षेचे प्रवेश पत्र उक्त संकेस्थळावरुन स्वतः डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पद्धतीने पाठविले जाणार नाही.

३३) पात्र उमेदवारांच्या अंतरिम तसेच अंतिम निकाल वरील संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल.

३४) सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर होईल अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पूरते नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधीत उमेदवाराने जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे संबंधीत कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सहा महिन्यांच्या आत वैधता प्रमाणपत्र संबंधित कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा सहा महिन्यांच्या कालावधीनंतर उमेदवाराचे नियुक्ती आदेश संबंधित कार्यालयामार्फत रद्द करण्यात येईल.

३५) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/आगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्यती कार्यवाही करण्यात येईल

३६) सदरची पदे अस्थायी स्वरुपाची असून शासनाच्या धोरणाअंती उमेदवाराची सेवा एक महिन्याची नोटीस देऊन केंव्हाही समाप्त करण्यात येईल.

३७) **अंतिम निवड**

अ) उमेदवाराची अंतिम निवड हि लेखी व तोंडी परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना **समान गुण मिळाल्यास** खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

१) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर

२) मागास वर्ग उमेदवाराच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमातीमधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी-१९९० – पूर्वीच्या २८ तत्सम जमाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाणे; त्यानंतर

३) शारीरिक दृष्ट्या अपंग असलेले उमेदवार त्यानंतर

४) माजी सैनिक असलेले उमेदवार त्यानंतर

५) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार

६) वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल.)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

३८) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्रातील मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती इत्यादी कोणत्याही परिमंडळात नियुक्ती देण्यात येईल.

३९) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अभियंत्यांच्या बदल्या महाराष्ट्रात कोठेही करण्यात येतील.

४०) गट-क संवर्गातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/वरिष्ठ लिपिक/कनिष्ठ लिपिक व संगणक या संवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना परिमंडळांतर्गत मुंबई/मुंबई उपनगरे रत्नागिरी/रायगड/ठाणे/सिंधुदुर्ग इत्यादी कोणत्याही ठिकाणी नियुक्ती दिली जाईल रुजू झाल्यानंतर विहित केलेली खातेनिहाय / अन्य परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

४१) शासकीय कर्मचा-यांच्या बदला बदली अधिनियम-२००५ अन्वये बदल्या करण्यात येतील. विनियम व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२०१०/१०/१२, दिनांक ०३/०६/२०११ मधील निर्देशानुसार अन्यत्र बदलीच्या तरतूदी लागू राहतील.

४२) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेली सर्व मुळ प्रमाणपत्रे व शासन निर्णयाच्या अटींची संबंधीत नियुक्ती अधिका-यामार्फत (संबंधीत अधीक्षक अभियंता) तपासणी करुन पुर्तता झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

४३) गट ‘क’ या संवर्गासाठी ज्या प्रवर्गासाठी रिक्त पद नाही अशा उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातून अर्ज करावेत.

४४) शासन निर्णय क्र.प्रनिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, मंत्रालय मुंबई, दि.२७/६/२००८ मध्ये विनिधिष्ठ केल्यानुसार लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त करतील अशा उमेद्वारांनाच व्यवसायिक चाचणी देता येईल. तसेच दि.१९/१०/२००७ च्या आदेशातील परिच्छेद क्र.५ मधील आ.क्र.१ ते आ.क्र.४ येथील तरतूदीनुसार कार्यवाही करताना गुणवत्ता यादीत अंतर्भाव करणेसाठी उमेदवारांने एकूण गुणाच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

४५) ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी मार्गदर्शन व सूचना :-

१) ऑनलाईन पद्धतीने अर्ज प्रक्रिया सुरु होण्याचा दिनांक व वेळ २०/१२/२०१२ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून

२) ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची अंतिम दिनांक व वेळ ०३/०१/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत

३) चलनाद्वारे परिक्षा शुल्क बँकेत भरण्याचा कालावधी दिनांक २०/१२/२०१२ ते दि.०५/०१/२०१३

४) परिक्षेचा दिनांक तसेच परिक्षेसाठी ऑनलाईन प्रवेश पत्र प्राप्त होण्याचा दिनांक इत्यादी माहिती www.pwdmumbaicircle.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल.

**जा.क्र.काअ/एघ/भरती/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,**
**२ रा मजला, बांधकाम भवन,**
**२५, मर्झबान रोड, फोर्ट,**
**मुंबई - ४०० ००१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६**
**दिनांक :-**

**सदस्य सचिव**
**तथा**
**कार्यकारी अभियंता,**
**एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,**
**मुंबई - ४०० ००१.**